प्रेसनोट दिनांक ३०.०६.२०२३

आलोसे- श्री. हेमंत माडीवाळप्पा नाईकवाडी, पद- वरीष्ट लिपीक जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय सोलापूर यांनी लाच रक्कम ४०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दाखवली म्हणुन गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र. |
| गुन्हा नोंद क्रमांक | सदर बझार पोलीस ठाणे सोलापूर शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७, प्रमाणे. |
| आरोपीचे नांव व कार्यालय | श्री. हेमंत माडीवाळप्पा नाईकवाडी, वय- ४४ वर्षे, पद- वरीष्ट लिपीक जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय सोलापूर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४०००/- रुपये लाचेची मागणी केली. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | - |
| थोडक्यात माहिती | पडताळणी दिनांक १३.०४.२०२३<br>यातील तक्रारदार यांचे विरोधात सावकारी दावा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, तथा सावकाराचा सहाय्यक निबंधक, सोलापूर यांचेकडे दावा दाखल केलेला होता. सदर दाव्यास स्थगिती मिळण्यास मा. उच्च न्यायालय,मुंबई येथे अर्ज दाखल करण्यासाठी तक्रारदार यांचे विरुध्द दाखल दाव्यातील रोजनाम्याचे नक्कला मिळणेबाबत तक्रारदार यांनी दिनांक २९.०३.२०२३ रोजी अर्ज दिला होता. सदरच्या नक्कला मिळणेसाठी तक्रारदार पाठपुरावा करत असताना लोकसेवक श्री. हेमंत नाईवाडी यांनी ४०००/- रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. सोलापूर येथे दिली होती.<br>सदर तक्रारीची पडताळणी दिनांक १३.०४.२०२३ रोजी केली असता लोकसेवक श्री. हेमंत माडीवाळप्पा नाईकवाडी, पद- वरीष्ट लिपीक जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय सोलापूर यांनी तक्रारदार यांचेकडे ४०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दाखवली म्हणून लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सदर बझार पोलीस ठाणे सोलापूर शहर येथे सुरु आहे. |
| मार्गदर्शन अधिकारी | श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक लाप्रवि, पुणे.<br>श्रीमती शितल जानवे, अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, पुणे. |
| सापळा पथक | श्री. गणेश कुंभार, पोलीस उपअधीक्षक, श्री. चंद्रकांत कोळी पोलीस निरीक्षक, श्री. उमाकांत महाडीक, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, सोलापूर.<br>पोलीस अंमलदार- पोह/ शिरीषकुमार सोनवणे, पोना/ श्रीराम घुगे, पोना/ नरोटे चालक सुरवसे सर्व ने. ॲन्टी करप्शन ब्युरो सोलापूर. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे सोलापूर जिल्हयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल अथवा त्याच्यावतीने लाच मागणा-या खाजगी व्यक्तींबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे टोल फ्री क्रमांक १०६४ अगर दुरध्वनी क्रमांक ०२१७-२३१२६६८ वर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता-** पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी रंगभवन चौक सोलापूर.

**संकेतस्थळ** - www.acbmaharashtra.gov.in

**ई मेल** - www.acbwebmail@mahapolice.gov.in

**ऑनलाईन तक्रार ॲप** – acbmaharashtra.net

**व्हॉटस ॲप क्रमांक** – 9930997700

सहा.पो.आयुक्त/पोलीस उप अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर.

Khandeekar

( चंद्रकांत कोळी )
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो सोलापूर.